तरुण भारत संवाद

# स्पेशल सायबर सेमिनारमध्ये २०० विद्यार्थ्यांचा सहभाग

## जिव्हाळा विद्यामंदिर येथे सेमीनारचे आयोजन

प्रतिनिधी
कुर्डुवाडी

येथील जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिर येथे सायबर गुन्ह्यांवर प्रतिबंध आणि सोशल मीडियाचा जबाबदारीपूर्वक वापर या विषयावर क्विक हिल फाउंडेशन व रोटरी क्लब पुणे यांच्यावतीने स्पेशल सायबर सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते.



कुर्डुवाडी : स्पेशल सायबर सेमिनारप्रसंगी विद्यार्थ्यांना माहिती देताना सारंग बालंके व इतर मान्यवर.

इयत्ता सहावी ते नववीच्या २०० विद्यार्थ्यांनी या सेमिनारमध्ये सहभाग नोंदवला. फॉरेन्सिक लॉचे दिनेश जी सुभेदार यांनी मोबाईल, इंटरनेट, वापरण्याबाबतच्या, योग्य पद्धतीच्या सूचना आपल्या मार्गदर्शनपर सेमिनारमधून दिल्या. ऑनलाईन गेम्स, व्हाट्सअप कॉल, फेसबुक, इंस्टाग्राम आदीच्या नोंदणी व वापराबाबतच्या सूचना विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकासह करून दाखवल्या. सायबर गुन्हे यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहेत. यासाठी विद्यार्थी म्हणून आपण कसे सजग राहावे याविषयीची संपूर्ण खबरदारी कशी घ्यावी? याबाबत माहिती रोटरी क्लब ऑफ पुणेचे संस्थापक सारंग बालंके यांनी विद्यार्थ्यांना सांगितली.

सायबर क्राईम म्हणजे काय ? भारतातील सायबर गुन्ह्यांची मोडस प्रेंडी ,ई–कॉमर्स आणि कायदेशीर बाबी इत्यादी बाबत विद्यार्थ्यांना असणाऱ्या सर्व प्रश्नांची उत्तरे आदरणीय दिनेश जी सुभेदार यांनी दिली. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना व शिक्षकांना सायबर शपथ देण्यात आली.

विद्यालयाचे संस्थापक शिवराज वायचळ सचिव अजित वायचळ ,मुख्याध्यापिका सारिका गोटे, अमित देवकुळे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.